# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,

## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**अहमदनगर जिल्ह्यातील आगामी "शितलहरीच्या" परिस्थीच्या अनुषंगाने कृषी क्षेत्रावर पडणाऱ्या प्रभावा आधारित अंदाज (१०.०१.२०२३ रोजी आरएमसी मुंबईव्दारे जारी केलेल्या जिल्हास्तरीय अंदाज आणि चेतावणीवर आधारित)**

| पिक | परिणाम व सल्ला |
|---|---|
| **सामान्य सल्ला** | थंडीची तीव्रता वाढण्याची शक्यता असल्याने पिकांना ईजा होण्याची शक्यता असते.<br>थंडी पासून संरक्षण होणेकरीता पिकांना रात्रीच्या वेळेस पाणी द्यावे त्यामुळे तापमान नियत्रित राहण्यास मदत होते.<br>थंडीमध्ये पिकांना खाते देणे टाळावे. थंडीमध्ये पिकांना मुळांची कार्य क्षमता कमी होते, त्यामुळे पिकाना खते दिल्यास ते उपयोगी पडत नाही.<br>थडीच्या कालावधीमध्ये अंतरमशागतीची कामे टाळावीत, त्यामुळे जमिनीच्या पृष्ठभागातील तापमान नियत्रित राहण्यास मदत होते. |
| **फळ पिके** | थंडीची तीव्रता वाढण्याची शक्यता असल्याने थडीमुळे फळ पिकाच्या फळांना ईजा होण्याची शक्यता असते.<br>त्याकरीता फळांना सच्छिद्र प्लास्टीक बॅगने झाकुण घ्यावे. |
| **द्राक्ष** | द्राक्ष बागेतील किमान तापमान १०° से पेक्षा कमी झाल्यास वेलीच्या शरीरशास्त्रीय हालचालींचे संतुलन बिघडते आणि मण्यातील हिरवे रंगद्रव्य गुलाबी रंगात बदलू शकते, याला गुलाबी मणी (पिंक बेरी) म्हणतात. या विकृती करीता कोणतेही रासायनिक उपाय अद्याप उपलब्ध नसल्याने घड पेपरने झाकल्यास तापमान नियत्रित राहण्यास मदत होते.<br>तसेच द्राक्ष बागेस रात्रीच्या वेळेस पाणी द्यावे. बोदावर आच्छादन केल्यास मुळांच्या कक्षेतील तापमान वाढण्यास मदत होते. किमान तापमान फारच कमी झाल्याच्या ठिकठिकाणी बागेत शेकोटी व धूर करावा त्यामुळे तापमान नियत्रित राहण्यास मदत होते. |
| **मोहरी, राजमा हरभरा** | जास्त काळ दंव बिदु पिकाच्या पानावर राहिल्यास संवेदनशील पिकांमध्ये बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते.<br>त्याकरीता ५०० पीपीएम थायो युरियाची (१००० लिटर पाण्यात ५०० ग्रॅम थायोयुरिया) फवारणी करावी. |
| **पशुधन** | थंडीची तीव्रता वाढण्याची शक्यता असल्याने,<br>रात्रीच्या वेळेस गुरांना गोठ्यात बांधावे आणि थंडीपासून बचाव कर नेकरीता गोठा कोरडा ठेवावा. थं डीपासून संरक्षण करणेकरीता जनावरांच्या आहारात प्रथिने व खनिजयुक्त पदार्थाचा वापर वाढवावा.<br>थंडीच्या काळात जनावरांच्या उर्जेची गरज भागविण्या करीता जनावरांना खनिज मिश्रीत मीठ, गव्हाचे धान्य व गूळ इत्यादी आहारामधून द्यावे.<br>सकाळच्या वेळी जनावरे चरावयास सोडू नये. |
| **कुक्कुट-पालन** | थंडीची तीव्रता वाढण्याची शक्यता असल्याने,<br>कोंबड्यांच्या शेडमध्ये कृत्रिम प्रकाश देऊन उष्णता निर्माण करावी. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला


## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : मफुकृवि राहुरी.
दि. : १०.०१.२०२३

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा
प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.